# महाराष्ट्रातील आदिवासी जातींचा विकास, समस्या व उपाय

**कु. पुनम सयाम**
संशोधक विद्यार्थी

---

**प्रस्तावना :**

एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला `आदिवासी समाज' म्हणतात. भारत देश हा विविध धर्म, पंथ, जाती, जमाती या बरोबर अनेक भाषा, संस्कृती यांच्या वेगळेपणाच्या विविधतेने नटलेला आहे. त्याचबरोबर भारतामध्ये 6000 पेक्षा जास्त जाती उपजाती आहेत. त्याचप्रमाणे विविध आदिवासी जमाती देखील आहेत. भारतातील सर्वच राज्यात व केंद्रशासित प्रदेशात आदिवासी समाज आपल्याला दिसून येतो. भारतामध्ये विविध जाती- जमाती आढळून येत असल्या तरी सर्वांमध्ये सर्व प्रथमत: भारतीय असल्याची जाणीव असल्यामुळे भारतामध्ये वास्तव्य करणाऱ्या समाजाला भारतीय समाज असे संबोधले जाते. भारतामध्ये सन 2001 च्या जनगणनेप्रमाणे आदिवासी समाजाची लोकसंख्या 84 कोटी असून ती एकूण लोकसंख्येच्या 8.2% इतकी आहे. आपल्या देशात 250 इतके मुख्य आदिवासी समूह असून ते भारतामध्ये सर्व दूर पसरलेले आहेत शिवाय ते 150 भाषा व 225 उपभाषा बोलतात त्याचबरोबर सन 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची देशातील एकूण लोकसंख्या 10.43 कोटी असून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 8.6% लोकसंख्या ही आदिवासी आहे. आदिवासींच्या एकूण लोकसंख्येपैकी 89.9% लोकसंख्या एकूण व डोंगराळ भागात वास्तव्यास आहे. त्यामध्ये महानगरामध्ये त्यांची संख्या नगण्य आहे. त्याचप्रमाणे भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दुसऱ्या क्रमांकावर असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. अगदी तसेच आदिवासींच्या लोकसंख्येत मध्य प्रदेश पाठोपाठ महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो महाराष्ट्रामध्ये आदिवासी समाजाच्या प्रामुख्याने 47 जमाती आढळतात. डोंगर दऱ्यांमध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजाची संस्कृती भाषा वेशभूषा यामुळे ही महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे वेगळेपण दिसून येते. महाराष्ट्रात आंध, गोंड, भिल्ल, परधान, महादेव, कोडी, पावरा, कोकणा, कोकणी, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत तसेच महाराष्ट्रात केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड या तीन आदिम जाती-जमातीचे वास्तव्य आढळून येते. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एक कोटी 15 लाख लोकसंखयात ही आदिवासी समाजाची आहे तिचे प्रमाण 8.87% आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

सदर संशोधन लेखाचा उद्देश हा आदिवासी समाजातील जातींचा सामाजिक विकास त्यांच्या समस्या यांचा अभ्यास करणे आणि त्यावर उपाय शोधणे हा आहे.

**आदिवासी जातींचा विकास :**

भारतातील आदिवासींच्या जमातींत कुटुंब हाच प्राथमिक गट आहे. पितृसत्ताक कुटुंबपद्धती अधिक जमातींत आढळते. परंतु मातृसत्ताक कुटुंबाचीही काही उदाहरणे आहेत. आसाममधील खासी, गारोइ. जमातींमधील मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रसिद्ध आहे. काही पितृवंशीय जमातींत मातृनिवास अपवाद म्हणून आढळतो. डेहराडून जिल्ह्यातील खस जमातीत बहुपतिकत्व आढळते. सर्व भाऊ आपल्या एक किंवा अनेक बायकांसह एकाच कुटुंबात

राहतात. पहिले मूल मोठ्या भावाचे मानले जाते व नंतरची मुले क्रमशः इतर भावांची मानली जातात. ओरिसातील खाडियांत एकविवाही पितृसत्ताक कुटुंब असते. शेतीकामात स्त्रियांना मज्जाव असतो व धर्मसमारंभात भाग घेण्यास त्यांस मनाई असते. एकंदरीत आदिवासी जमातींत कुटुंबाचा एकच एक विशिष्ट प्रकार आढळत नाही. नागा जमाती एकविवाही अथवा बहुपत्नी विवाही असतात, परंतु पितृसत्ताक असतात. त्यांच्या शेजारीच मातृसत्ताक कुटुंब असलेल्या खासी जमातीचे वास्तव्य आहे. तोडा, खासी व कादर या जमाती मातृपितृसत्ताक आहेत. मध्य भारतातील जमाती बहुतेक पितृसत्ताक आहेत.

बऱ्याच जमाती स्वतंत्र उपजमातींत विभागलेल्या आढळतात. या उपजमाती अंतर्विवाही बनल्या आहेत. गोंड जमातीत अनेक उपजमाती निर्माण झाल्या आहेत. त्यांत सांस्कृतिक भिन्नताही आढळते. मध्य प्रदेशचे गोंड, बस्तरचे मुडिया व माडिया, आंध्र प्रदेशातील राजगोंड व कोया ह्या मूळच्या उपजमाती आता स्वतंत्र झाल्या आहेत. त्यांच्यात परस्परांत विवाह होत नाही. नागा जमातीचेही असेच आहे. राजगोंडी जमातीत चार सकुलक आहेत व ते बावीस कुळींचे बनलेले आहेत. कुळी व सकुलक दोन्ही बहिर्विवाही आहेत. अंदमान बेटावरील आदिवासी तसेच कादर ही जमात सोडल्यास भारतातील इतर सर्व आदिवासी जमातींत कुळी आहेत. संथाळ जमातीत शंभरावर कुळी आहेत. हो जमातीत ५०, तर मुंडा जमातीत ६४ कुळी आहेत. बऱ्याच जमातींत कुळींची स्वतंत्र गणचिन्हे असतात. गणचिन्ह असलेल्या प्राण्यास न मारणे, तो मेल्यास शोक करणे व कोणत्यातरी स्वरूपात त्याचे चित्र धारण करणे या प्रथा गणचिन्हाशी निगडित असतात. ओरिसातील जुआंग व कोंड जमातींत एका गावातील मुलामुलींचे विवाह त्याच गावात होत नाहीत.

कुटुंब, कुळी, सकुलक, अर्धक व गाव या व्यतिरिक्त सामाजिक संघटनेचा महत्त्वाचा घटक नातेसंबंध. अधिकांश आदिवासी जमातींत वर्गात्मक नातेसंबंध आहेत. दर्शक अथवा वर्णनात्मक संबंध कमी आहेत. तोडा जमातीत 'पिता' या आप्तसंज्ञेत पित्याचे भाऊ, कुळीतील पित्याच्या वयाचे सर्व पुरुष व मावशीचे पती यांचाही समावेश होतो. सेमा नागांत 'आज' ही संज्ञा माता, काकू व मावशीस लागू पडते. माता व काकूकरिता असलेली एकच संज्ञा देवरविवाह सुचविते, तर माता व मावशीकरिता वापरण्यात येणारी एकच संज्ञा मेहुणीविवाहाची प्रथा सूचित करते. पिता, काका व मावशीचा नवरा भाऊभाऊ असावेत हे दिसते. आत्या व मावशीकरिता एक संज्ञा आते-मामे भावंडांतील विवाहाची द्योतक आहे. कुकी कुळीत पित्याचा पिता, मातेचा पिता, मामा, पत्नीचा पिता, मामेभाऊ, पत्नीचा भाऊ व पत्नीच्या भावाचा मुलगा यांस 'हेपू' म्हणतात; म्हणजे वेगवेगळ्या पिढीच्या लोकांना एकच संज्ञा वापरली जाते. अंगामी नागांत थोरला भाऊ, बायकोची थोरली बहीण, नवऱ्याचा मोठा भाऊ, थोरल्या बहिणीचा नवरा, थोरल्या भावाची बायको, मामी व काकू या सर्वांस 'शि' संज्ञा वापरतात. यांत लिंगभेद पाळण्यात आलेला नाही. ओराओं जमातीत आत्या, मामा, मावशी व सासू यांस 'ताची' म्हणतात. यावरून आते-मामे भावंडातील विवाह व मेहुणीविवाह सूचित होतात. अशा प्रकारे आप्तसंज्ञांवरून सामाजिक चालीरीतींचे दर्शन घडते.

बहुतेक सर्व भारतीय आदिवासी जमातींत पुरुष आपल्या धाकट्या भावजयींशी व थोरल्या मेहुणींशी परिहार्यसंबंध पाळतात. एकमेकांशी बोलणे, स्पर्श करणे, एकांतात बसणे निषिद्ध समजले जाते. याउलट पुरुष भावजयीशी वा धाकट्या मेहुणीशी सलगीसंबंध ठेवू शकतो.

जीवनचक्रातील जन्म, विवाह व मृत्यू या तीन महत्त्वाच्या अवस्थांशी आदिवासींचे रीतिरिवाज निगडित झालेले आहेत. यांशिवाय नामकरण, दीक्षाविधी, रजोदर्शनविधी इ. संस्कारही महत्त्वपूर्ण असतात. पूर्वजआत्म्यास त्याच कुटुंबात पुनर्जन्म घेण्याची इच्छा असल्यास व देवाने तसा आदेश दिल्यास गर्भाधान होते, असा कमार

जमातीत समज आहे. बोंडो जमातीत मुलगा झाल्यास पतिपत्नीला दोन महिने व मुलगी झाल्यास तीन महिने एकमेकांपासून वेगळे करण्यात येते.

भारतीय आदिवासींत जोडीदार मिळविण्याचे बरेच प्रकार आहेत. कुकी जमातीत मुलगा मुलीकडे जाऊन राहतो. त्यांचे एकमेकांशी पटल्यास विवाह होतो. विवाह न झाल्यास मुलगा मुलीच्या पित्यास भरपाई देतो. बळजबरीचे विवाह कमी झाले आहेत, तथापि नागा, गोंड, भिल्ल, हो इ. जमातींत अजून हा प्रकार आढळतो. वधूमूल्य देता न आल्यास मुलगा मुलीकडे जाऊन शेतावर काम करतो व त्याच्या मजुरीच्या रूपाने वधूमूल्य दिले जाते. गोंड, बिऱ्होर व बैगा जमातींत अशा प्रकारचे सेवाविवाह आढळतात. तसेच दोन कुटुंबांनी आपल्या मुलींची परस्परांत अदलाबदल केल्यास वधूमूल्याचे प्रश्न उद्‌भवत नाहीत. बहुतेक सर्व जमातींत हा प्रकार आढळतो. तसेच मुलामुलींचा विवाह कुटुंबियांना अमान्य असल्यास दोघेही पळून जाऊन विवाहबद्ध होतात. यास सहपलायनाविवाह म्हणतात. भिल्ल जमातीत होळीच्या अथवा दिवाळीच्या प्रसंगी गर्दीचा फायदा घेऊन असे पलायनाचे प्रकार घडतात. हो व बिऱ्होर जमातींमधील मुलगी ज्या मुलाशी लग्न करावयाचे असते, त्याची संमती नसतानाही त्याच्या घरात घुसते. मारहाण केली किंवा मानहानी केली, तरी ती जात नाही व तिच्याशी विवाह केल्याशिवाय गत्यंतरच राहात नाही. यास पैठू विवाह किंवा अनादरविवाह म्हणतात.

आदिवासींत बालविवाह क्वचितच आढळतात, मात्र विधवाविवाह सर्वमान्य आहे. खाडिया जमातीत विधवेच्या पुनर्विवाहात वधूमूल्य द्यावे लागत नाही. हो जमातीत वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी मुलीचा व वयाच्या चोविसाव्या वर्षापूर्वी मुलाचा विवाह होत नाही. मुलगी अविवाहित राहिल्यास ती चेटकीण होण्याचा संभव असतो. देवरविवाह व मेहुणीविवाह बहुधा सर्व जमातींत मान्य असतो.

खाडिया, ओराओं व गोंड जमातींत आते-मामे भावंड विवाहास अग्रक्रम देण्यात येतो. गोंड जमातीत तसा विवाह न केल्यास दंड भरावा लागतो. खासी, संथाळ व कादर या एकविवाही जमाती आहेत. वधूमूल्याची रक्कम मोठी असते, त्यामुळे हो जमातीत बहुपत्नीविवाह अशक्य आहे. मात्र तो भिल्ल, गोंड, बैगा इ. जमातींत रूढ आहे. भ्रातृक बहुपतिविवाह तोडा व खस जमातींत आढळतात.

बहुतेक सर्व जमातींत विवाहपूर्व लैंगिक संबंधांकडे दुर्लक्ष केले जाते. गर्भाधान झाल्यास संबंधित व्यक्तींना विवाह करावा लागतो. वधूमूल्य देण्यात येत नाही किंवा अल्पसे देण्यात येते. गोंड जमातीत अविवाहित मुले व मुली एकाच युवागृहात झोपतात. विवाहबाह्य संबंधांतून खुनाचे प्रकार उद्‌भवतात. माडिया व भिल्ल जमातींत व्यभिचारामुळे खून पडतात. बहुपतिक खस जमातीत पत्नीला विवाहबाह्य संबंध ठेवता येत नाहीत; परंतु माहेरी गेल्यावर मुलगी या नात्याने तिच्यावर बंधने नसतात.

आदिवासींत घटस्फोट मान्य आहे. खासी जमातीत व्यभिचार, वंध्यता व बेबनाव या कारणांकरिता घटस्फोट मिळतो. घटस्फोट सार्वजनिक विधी असतो. ईशान्य भारतातील लुशाई जमातीत नवऱ्याने बायकोस टाकल्यास तो भरपाई देतो. स्त्री व्यभिचारी असल्यास तिला वधूमूल्याची रक्कम नवऱ्यास परत करावी लागते. गोंड, मुडिया व खाडिया जमातींतही वरील कारणांनी घटस्फोट मिळतो. भरपाईची रक्कम पंचायत ठरविते. आदिवासी जमातींत मृत्यू हा जीवनाचा शेवट मानीत नाहीत. मृत्यू हा एक अपघात असतो : देवाचा कोप, मृतात्मे, जीवात्मे व भूतात्म्यांचा रोष, चेटूक इत्यादींमुळे मृत्यू येतो, अशी आदिवासींची समजूत असते. शवाचे दहन अथवा दफन करण्यात येते. मृत व्यक्ती वृद्ध असल्यास शवाचे बहुधा दहन करतात. मयताच्या वस्तूंवर चेटूक करणे शक्य असते म्हणून त्या त्याज्य असतात. दफनाच्या जागी लाकडावर किंवा दगडावर कोरलेले स्मारक उभे करण्यात येते.काही



Research Hub International Journal

काळ गेल्यावर मृतात्म्यास परत आवाहन करण्यात येते व त्यास सर्वांचे रक्षण करण्याची विनंती केली जाते. शुद्धिस्नान व शुद्धिभोजन करण्यात येते.

भारतातील बऱ्याच जमातींत युवागृहे आढळतात. मुंडा, हो, ओराओं, खाडिया, गोंड, भूईया व नागा जमातींत ही संस्था महत्त्वपूर्ण आहे. युवागृहांना त्या त्या जमातीत निरनिराळ्या संज्ञा असतात. स्त्रियांच्या व पुरुषांच्या युवागृहांना काहींच्यामध्ये भिन्न भिन्न संज्ञाही असतात. दक्षिणेत मुथुवन, मन्नन व पल्लियन जमातींत युवागृहे आढळतात. युवागृहे गावाच्या एका टोकास असतात. युवागृहांत आदिवासी संस्कृतीचे शिक्षण दिले जाते. मुडियांच्या गोटुलमधील लैंगिक जीवनाचे व्हेरिअर एल्विनने यथातथ्य वर्णन केले आहे. युवागृहातील वातावरण अत्यंत उत्साहवर्धक असते. युवकांचे ते स्वतंत्र राज्यच असते. युवागृहातील घटनांबाबत गुप्तता पाळण्यात येते. युवागृहे केवळ मनोरंजनाची स्थाने नसून, आदिवासी संस्कृतीचे शिक्षण देणाऱ्या संस्थाच होत. तेथे नेतृत्वाचे तसेच धर्म व जादूटोण्याचेही शिक्षण देण्यात येते. अलीकडे त्यांचा अतिथिगृह म्हणूनही उपयोग करण्यात येतो.

**आदिवासींच्या समस्या :**

आदिवासींना त्यांचं स्वत:चं एक अस्तित्व आहे, हे मुळात महाराष्ट्रातील जनतेने मान्य करायला हवं. आजही आदिवासींमधे चांगल्या प्रथा आहेत. सामुहिक जीवनपद्धती, सामुहिक निर्णय, आवश्यक तेवढेच पिकवणे, जंगलाचे संरक्षण करणे, अशा एक ना अनेक गोष्टी आदिवासींकडून शिकण्यासारख्या आहेत. त्यातून आपल्याला बरेच शिकण्याजोगे आहे, त्या तशाच पुढे आल्या पाहिजेत. आदिवासी समाजाने निसर्गाच्या विरुद्ध कधी पाऊल टाकले नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणे आदिवासी आपले जीवन जगत असतो. म्हणून इतरांनीही निसर्गाला समजून घेणे आवश्यक आहे. आदिवासींनी खऱ्या अथाने जंगलाचे रक्षण केले. समतोल राखण्याचे काम केले. आदिवासींना जंगलाचे, वनस्पतींच्या वापराबद्दलचे ज्ञान आहे, ते जतन करावयास हवे. त्यांचे सण, उत्सव, वेगवेगळे विधी हे निसर्गाला कोणतीही हानी न करता साजरे केले जातात. गोंगाट, वारेमाप खर्च, इतरांना त्रास होईल असा कोणताच सण, उत्सव किंवा विधी आदिवासींमधे नाही. तरीही आजचा आदिवासी चूकीच्या आणि अपूऱ्या विकास नियोजनांमुळे अनेक समस्यांनी ग्रस्त आहे.

जंगल आणि जंगलातील प्राण्यांचे संरक्षण करण्याच्या निमित्ताने इंग्रजांनी जंगल कायदा बनविला. यामुळे जंगलावरील आदिवासींचा हक्क आपोआपच हिरावला गेला. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे आदिवासींबाबतचे धोरण हे आदिवासींना आहे त्या स्थितीत ठेवण्याचेच होते. आदिवासींवर हुकुमत गाजवणे तसे त्यांनाही अवघड होते. आदिवासींचे दुर्गम भागातील वास्तव्य हे एक त्यामागील कारण होते. आदिवासींनी इंग्रजांना त्यांच्या इलाक्यात वा जंगलात यायला प्रतिबंध केल्याची उदाहरणे पहायला मिळतात. आदिवासींनी इंग्रजांच्या विरोधात बंड केल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळेच आदिवासींमधे राजकीय जागृती होऊ न देणे, ते एकत्र येणार नाहीत याची इंग्रजांनी 'कायदेशीर' तरतूद केली. १८६४ सालचा जंगल संरक्षण कायदा हा त्यासाठीच आणला. जंगल संरक्षण करण्याच्या बहाण्याने इंग्रजांनी मग जंगलावरच आक्रमण करायला सुरुवात केली. अक्षरश: जंगलाची लूट केली. या जंगलसंरक्षण कायद्याच्या अतिरेकी धोरणामूळे आदिवासींना त्यांच्या पारंपारिक अशा अनेक हक्कांना मुकावे लागले. सुरुवातीस आदिवासी गावाची सामुदायिक असणारी जमिन वैयक्तिक करण्यावर इंग्रजांनी सुरुवात केली. फूट पाडून त्यांचे जंगल आणि जमिन ही उदर्निर्वाहाची साधने व्यापारी वृत्तीच्या लोकांनी बळकावली. त्यांच्या निरक्षरतेचा, अज्ञानाचा, दुबळेपाणाचा फायदा सावकार, कंत्राटदार, दलाल यांनी घेतला. कायद्यांमुळे व्यापारी वृत्तीच्या आधूनिक अर्थव्यवस्थेत ते खेचले जाऊन अनेक समस्यांच्या फेऱ्यात ते अडकले. त्याचा परिणाम

आत्यंतिक दारिद्र्य, वेठबिगारी, स्थलांतर, कुपोषण आणि बालमृत्यू असे अनेक आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. त्यांच्या आयुष्यात गुंतागुंत वाढली.

**उपाययोजना :**

भटक्या जमातींचे आणि विमुक्त जमातींचे जीवन भटके असल्यामुळे त्यांच्यासाठी योजलेल्या कल्याणकारी योजनांची फलश्रुती सर्वसामान्यपणे त्यांना मिळाली नाही, असे म्हटले जाते. भटक्यांचे भटकेपण सुटण्यासाठी आणि सुस्थिर व व्यवस्थित जीवन जगणे त्यांना सुलभ व्हावे म्हणून खालील उपाय सुचवावेसे वाटतात

- सर्व भटक्या आणि विमुक्त जमातीच्या कुटूंबांना कायमस्वरुपी स्थिर करणे, ज्यामुळे त्यांचे भटकेपण संपून त्यांना स्थिर आयुष्य जगता येईल.
- या जमातीतील प्रत्येक कुटूंबाला कायमस्वरुपी निवाऱ्यासाठी घर बांधून देणे किंवा त्यासाठी १०० % अनुदान देणे.
- भटक्या आणि विमुक्त जातींच्या जनगणनेच्या वेळी विस्तृत नोंदी करणे आवश्यक आहे. नेमकी आकडेवारी नसल्याने योजना आखताना अडचणी येतात.
- भटक्या आणि विमुक्तांसाठी असलेल्या स्वयंसेवी / अशासकिय संस्थांना सरकारने मदत करणे आवश्यक आहे (उदा. अशा जमातीतील मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळा).
- या जमातीतील तरुणांना विविध प्रकारच्या कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.
- आदिवासींचा आर्थिक विकासाकडे लक्ष देणे.
- सावकार व ठेकेदार यांच्या पाशवी जाळातुन आदिवासींचा बचाव करणे.
- आदिवासींच्या जल, जंगल, जमिनीचे स्वंरक्षण करणे.
- ग्रामिण भागातील आदिवासींच्या आरोग्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातुन आरोग्य विषयक सुख सुविधाचा पुरवढा करण्याकडे लक्ष देणे.
- आदिवासी मध्ये शिक्षण विषयक जनजागृती करून शिक्षणाचे महत्व पटवुन देणे.
- आदिवासीमधील आंधश्रधेवर आळा घालुन त्यांच्यात जनजागृती करणे.
- आदिवासींना मादक पदार्थाचे सेवन न करण्यास परावृत्त करणे व दारूबंदीवर विशेष मोहीम राबविने.
- आदिवासी भागात 'गांव तेथे रस्ता'ही योजना राबवुन दिवा बत्तीची व्यवस्था करावी.
- आदिवासींचे शोषण व त्यांची फसवनुक कणाÚयावर कडक कारवाई करण्यात यावी..
- आदिवासींच्या जमिनी बळकावण्यात येत आहेत. त्यावर न्यायालयानी तंतोतंत कारवई करावी. व आदिवासींच्या जमीनी त्यांना परत कराव्या.
- आदिवासीं विकास विभागात होणाÚया भ्रष्टचारावर शासणानी निपुन्ता आणावी.
- आदिवासी वसतीगृह व आश्रमशाळेत होणारा भ्रष्टाचार व तेथील समस्यावरील उपाय योजनेकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
- आदिवासींना मिळणाÚया योजना त्यांच्या पर्यंत पोहचतात की नाही याकडे शासनाही गांभीर्याने लक्ष देऊन तेथील ग्रामिण भागात जाऊन प्रत्यक्षात पाहनी करणे आवश्यक आहे.
- आदिवींना प्रगत समाजाच्या संपर्कात आनावे, परंतु आदिवासींच्या संस्कृतीवर हल्ला ही ेऊ नये याकडे विशेष गाभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.



Research Hub International Journal

**समारोप :**

आदिवासींच्या दूर्दैवाने स्वातंत्र्यानंतरही जंगल कायद्यामधे त्यांना हवी ती सुधारणा झाली नाही. आदिवासींचा राज्यकर्त्यांनीही फारसा विचार केला नाही. धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग न घेता धोरणांची अंमलबजावणी करण्याचे शासनाने एकांगीपणे निर्णय घेतले. त्यांना नको असलेल्या 'मुख्य प्रवाहात' आणण्यासाठी, त्यांची जीवनपद्धती विचारात न घेता 'कल्याणकारी' योजनांची त्यांच्यावर सक्ती करण्यात आली. यातील बहुतांशी योजना या वैयक्तिक लाभाच्या असल्याने त्यांच्या सामुहिक जीवन प्रक्रियेलाच तडे जाऊ लागले. याचा परिणाम म्हणून आजही या समस्या स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतर तशाच आहेत.

**संदर्भसूची:**

- क-हाडे, बाबू, (2004), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपुर; मानवता सांस्कृतिक विकास व शोध केंद्र चामोर्शी, हिंद मुद्रणालय महाल, पुष्ट क्रं. 4.
- आकरे, बी. एन.,(2009), आदिवासी जिवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम, नागपूर पिंपळापुरे बुक डिस्टीबुटर्स पुष्ट क्रं. 3.
- फडके, सुधीर, (1963), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे; जोषी आणि लोखंडे प्रकाशन, पुष्ट क्रं. 19,103.
- नाडगोंडे, गुरूनाथ, (2004 तृतीय आवृती), भारतीय आदिवासी, पुणे; कॉन्टिनेन्टल प्रकाषन. पुष्ट क्र. 1
- गारे, गोविंद, (2009), आदिवासींचे शिक्षण, औरंगाबाद; साकेत प्रकाशन प्रा.लि. पुष्ट क्र. 20-23.

Research Hub International Journal